Title of Programme: **शिक्षक दिन**

Name of Organizing Department : **कला शाखा**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : ०५/९/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

Target Group: **सर्व विद्यार्थी**

Number of Participants: ३००

Name of Resource Person: **मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब**

Total Expenditure for the Programme: - १७०० /-

Source of Funding: - **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**Report: शिक्षक दिन कार्यक्रम अहवाल**

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात कला शाखेच्या वतीने ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. देशाचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या शिक्षक दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना शिक्षकाची भूमिका, जबाबदारी आणि अध्यापन प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज, हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या प्रतिमांचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या पुतळ्यास संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिक्षकाची भूमिका स्वीकारली. संस्कार वायकर, दुर्गेश कुंभार, शुभम शिंदे, अविष्कार शिंदे, अनिकेत तांबे, सार्थक पडवळ, रिद्धी शिंदे, ज्ञानेश्वरी जोशी, दीक्षा जाधव, ऋतुजा कैकके, सुप्रिया ठोकळ, प्रांजळ पिसाळ, साधना पवळे, प्रियंका लोहट, दिव्या गार्डी, तेजस सोंडकर, सोनाली मुठे, साक्षी वाळुंज, तुषार गभाले, अजय इबितवार, जागृती नरवडे, ईश्वरी आंबेरकर आणि उदय नरवडे या विद्यार्थ्यांनी शिक्षक म्हणून सहभाग घेतला.

विशेष म्हणजे अजय इबितवार या विद्यार्थ्याने कला शाखेचा उपप्राचार्य म्हणून कामकाज पाहिले. विद्यार्थ्यांनी शिक्षक व महाविद्यालयीन पदाधिकाऱ्यांच्या विविध भूमिका प्रत्यक्ष अनुभवत जबाबदारीचे भान आणि नेतृत्वगुणांचा अनुभव घेतला. या अभिनव उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अध्यापन प्रक्रियेचा तसेच शिक्षक म्हणून काम करताना आवश्यक असलेल्या जबाबदारीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला.

या प्रसंगी दीक्षा जाधव, जागृती नरवडे आणि संस्कार वायकर या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. त्यांनी शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करत आपल्या अनुभवांना शब्द दिले.

HRM

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे केवळ पदवी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता ज्ञान, संस्कार आणि व्यक्तिमत्त्व विकासाचे माध्यम म्हणून पाहावे, असा संदेश त्यांनी दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे आणि उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या भूमिकेतून घेतलेल्या अनुभवांविषयी जाणून घेत त्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या भूमिकेतून काम करण्याची संधी मिळाल्याने शिक्षकांचे कार्य, त्यांची जबाबदारी आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे असलेले महत्त्व यांची त्यांना प्रत्यक्ष जाणीव झाली. त्यामुळे शिक्षक दिनाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अनुभवाधिष्ठित शिक्षण, नेतृत्वविकास आणि व्यक्तिमत्त्व विकासाची अर्थपूर्ण संधी ठरला. सूत्रसंचालन किसन राजभर व पुनमकुमारी मदन राम यांनी केले.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.







विद्यार्थ्यांचे स्वागत करताना संस्था पदाधिकारी




खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील साहेब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना






प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना




शिक्षक झालेले विद्यार्थी

HE